शुक्रवार, दि. २७ जून २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३२१ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## शेतकऱ्यांविरोधी बोललो नाही परंतु विषय शेतकऱ्यांचा असेल तर हजार वेळा माफी मागायला तयार - आमदार लोणीकर

### शेतकरी कष्टकऱ्यांसाठी ४० वर्ष लढा देणारा एक कार्यकर्ता शेतकऱ्यांसंदर्भात कुठलाही अपशब्द वापरला नाही

**जालना | प्रतिनिधी -** गेली ४० वर्ष राजकीय आणि सामाजिक जीवनात काम करत असताना मी सातत्याने शेतकऱ्यांची बाजू घेतली आहे शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी पंचवीस पंचवीस हजार शेतकऱ्यांची मोर्चे काढले आहेत सातत्याने शेतकऱ्यांची बाजू घेत गारपीट असेल दुष्काळ असेल अशा नैसर्गिक संकटांमध्ये शेतकऱ्यांच्या बाजूने भूमिका घेत अनेक वेळा शासनासोबत लढा दिला आहे मी स्वतः शेतकरी कुटुंबातील असून मला शेतकऱ्यांचे दुःख कळत त्यामुळे मी शेतकऱ्याविरोधी बोलूच शकत नाही, यापूर्वीही बोललो नाही, यापुढेही बोलणार नाही. परंतु विषय शेतकऱ्यांचा असेल तर मी हजार वेळा माफी मागायला तयार असल्याचे प्रतिपादन माजीमंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी आज केले.

जालना भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषद प्राथमिक आमदार बबनराव लोणीकर बोलत होते. यावेळी बोलताना लोणीकर म्हणाले की, ग्रामीण भागातील सर्वसामान्य लोकांना वडील या शब्दापेक्षा बाप आणि आई या शब्दापेक्षा माय हा शब्द अधिक प्रचलित वाटतो. ग्रामीण भागात जी भाषा जो शब्दप्रयोग प्रचलित आहे त्यानुसार बोलावं लागतं. त्यामुळे बाप या शब्दाचा शब्दाचा माझ्या भाषणातून झाला परंतु हे बोलत असताना मी हे सर्व शब्द शेतकऱ्यांना विरोधी किंवा शेतकऱ्यांसाठी वापरलेले नाही. पक्षातील काही पेड सोशल मीडिया चालवणाऱ्या १०-१२ लोकांचे टोळके कायम पंतप्रधान नरेंद्र मोदी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि माझ्या विरोधी निरर्थक आणि तथ्यहीन बाबी समाज माध्यमांवर टाकत रोल करत असतात त्यांच्याबद्दल सांगताना मी हे बोललो आहे.

ट्रोल करणारे हे लोक त्यांच्या कुटुंबामध्ये केंद्र व राज्य सरकारच्या सगळे योजनांचा लाभ घेतात त्यामध्ये किसान सन्मान योजना लाडकी बहिणी योजना संजय गांधी निराधार योजना श्रावण बाळ योजना यासारख्या विविध योजनांचा समावेश असतो शासनाच्या सर्व योजनांचा लाभ घ्यायचा आणि पुन्हा मोदी फडणवीसांना ट्रोल करायचं त्यासाठी विरोधी पक्षाकडून त्यांना पॅकेज दिले जाते त्यामुळे त्या १०-१२ लोकांच्या टोकया संदर्भात वाटूर येथील सभेमध्ये मी बोललो होतो असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले.



शेतकऱ्यांच्या प्रश्नावर मी सातत्याने आवाज उठवला असून सत्ताधारी आमदार असताना सुद्धा शेतकऱ्यांचा कर्जमाफीचा मुद्दा या वर्षी झालेल्या अर्थसंकल्प अधिवेशनामध्ये मी सर्वप्रथम मांडला. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर मी सातत्याने शेतकऱ्यांच्या बाजूने भूमिका घेतली आहे सत्तेत असो किंवा नसो माझी शेतकऱ्यांच्या बाजूने असलेली भूमिका कधीही बदललेली नाही यापुढे देखील बदलणार नाही त्यामुळे मी शेतकऱ्यांच्या विरोधी बोलण्याचा प्रश्नच येत नाही माझ्या बोलण्याचा राजकीय फायदा घेण्याच्या दृष्टीने विरोधकांनी भांडवल करत मीडियासमोर विपर्यास केला आहे. असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

## जिल्ह्यातील एकही सुशिक्षीत तरुण बेरोजगार राहणार नाही - मंत्री मंगलप्रभात लोढा

### रोजगार मेळावा उत्साहात संपन्न

**जालना | प्रतिनिधी -** राज्यात जालना हे औद्योगिकीकरण झपाट्याने वाढणारे शहर म्हणून नावारुपास येत आहे. येथील तरुणांच्या हाताला काम मिळण्यासाठी तसेच स्वयंरोजगाराच्या वाटा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासन सकारात्मक पावले टाकत आहेत. तरी स्थानिक औद्योगिक कंपन्यामध्ये ज्या रोजगार कौशल्याची मागणी असेल त्या व्यवसायातील प्रशिक्षण देवून उमेदवारात कौशल्य वाढवून कुशल मनुष्यबळ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून उपलब्ध करुन दिले जाईल. त्यामुळे प्रत्येकाच्या हाताला काम मिळाल्याने जालना जिल्ह्यातील एकही सुशिक्षीत तरुण बेरोजगार राहणार नाही, अशी नि:संदिग्ध ग्वाही राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली.

कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पाथ्रीकर कॅम्पस, बदनापूर येथे पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार नारायण कुचे, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, कौशल्य विकास विभाग आयुक्त लहू माळी, कौशल्य विकास विभाग सहायक आयुक्त गणेश चिमणकर, कौशल्य विकास विभाग उपायुक्त विद्या शितोळे, देवेश पाथ्रीकर, सहसंचालक पी.टी. देवतळे, डॉ.जकीर पठाण यांच्यासह संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

मंत्री श्री.लोढा म्हणाले की, उद्योजक व शासन एकत्र येवून काम केले तर निश्चित महाराष्ट्राची भरभराट होईल. याकरीता पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप महत्वाची आहे. ही



औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत राबवून कुशल मनुष्यबळाची निर्मिती केली जाणार आहे. पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यातून ४० कंपन्यांनी आज रोजगार उपलब्ध करुन दिला आहे. कायदा व सुव्यवस्था आणि मनुष्यबळ या आधारावरच नवीन उद्योग उभारत असतो. उद्योग उभारणीत कुशल मनुष्यबळ अत्यंत महत्वाचा घटक आहे. त्यामुळे कुशल मनुष्यबळाची उभारणी करणे गरजेचे आहे. उद्योजकांच्या तांत्रिक गरजेनूसार आयटीआयच्या माध्यमातून नवनवीन व्यवसाय पान २ वर

युवा आदर्श

### साकडे ...

अनधिकृत होर्डिंगस्
इवल्या पावसाने पडे
कुणाची जबाबदारी
शिंतोडे चारित्र्यां उडे
कोण कुठल्या पक्षांचे
आपसात करी झगडे
अंगलट येता दुष्कृत्ये
परदेशी पळती भगोडे
घ्या अटकपूर्वजामीन
कायदेतज्ञ असे रांगडे
भावना विक्रीस काढू
छातीवर ठेविले दगडे
दोष थोपा एकदुजांस
रंगे राजकीय आखाडे
पीडीतांची दीनावस्था
कोण ऐकणारं दुखडे
अडकून टाके खुशाल
दुजांच्या गळ्या घोंगडे
तात्पुरते फलक बाजू
पुनः नवोत्साहात खडे
पैसा कमावण्या नादात
मनोरे क्षणार्धां गडगडे
जीव हकनाक चालले
काळजांत ना भडभडे
गगनचुंबी होर्डिंग्ज ते
आपणच करतो खडे
चूक जरीही माणसांची
देवाला घालतो साकडे

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

झाडे लावा
झाडे जगवा

## आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका जिंकण्यासाठी कार्यकर्त्यांनी तयारीला लागावे -मंत्री लोढा

**जालना | प्रतिनिधी -** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ह्या लवकरच होणार असून, स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये पक्षाची सत्ता आणण्यासाठी कार्यकर्त्यांनी देशातील नरेंद्र मोदी सरकारने व राज्यातील देवेंद्र फडणवीस सरकारने केलेल्या जनहिताच्या योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहचवून देशात व राज्यात केंद्र व राज्य सरकारने केलेले कामे हि समजून सांगावी, आपल्या जिल्ह्यात सर्व स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये विजय मिळवावा असे त्यांनी भाजपा कार्यालयात झालेल्या जालना महानगर व जालना ग्रामिण जिल्ह्याच्या कोअर कमिटी पक्ष पदाधिकारी, कार्यकर्ता, बंधू-भगिनी यांच्यासोबत संवाद साधताना केले. यावेळी माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर, भाजपा जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे, भाजप जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, मनोज पांगारकर राजेश राऊत, अशोक पांगारकर, सौ.संध्याताई देठे, सौ.आशाताई पांडे, शुभांगीताई देशपांडे, अरुणाताई जाधव, रामेश्वर भांदरगे, विजय कामड, बद्रीनाथ पठाडे, यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना ते म्हणाले स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका मध्ये विजय मिळवणे हे भारतीय जनता पार्टीचे ध्येय साध्य करण्यासाठी बूथ प्रमुखापासून ते मंडळ अध्यक्ष जिल्हा अध्यक्ष अशा सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे आणि आपण ते निश्चित पूर्ण करणार




असा मला विश्वास आहे असे त्यांनी सांगितले. यावेळी माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर, भाजपा जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे, पान २ वर

## एसबीआय बँकेकडून गोंधनखेडा येथे शेतकरी संवाद मेळावा संपन्न



**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** एसबीआय बँकेच्या वाणिज्यिक शाखा जाफराबाद यांनी शेतकरी संध्या शिबिर गोंधनखेडा या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते. यावेळी कृषी कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांसह गावातील न उद्योजक तरुण माता भगिनी यांच्यासोबत. एसबीआय बँकेचे महाव्यवस्थापक श्रीराम सिंह. यांनी संवाद साधला या वेळेला त्यांनी शेतकऱ्यांना सांगितले की आपण जर रेगुलर कर्ज त्याठिकाणी भरले तर आपली बँकेमध्ये पत वाढते आणि आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी आपल्याला उद्योग उभारणीसाठी बँक आपल्या पाठीशी खंबीरपणे उभी राहिल. असे आदरणीय श्रीराम सिंह साहेब यांनी माहिती दिली. यांच्यासोबत उपमहाव्यवस्थापक विकास गुप्ता सर यांनी सुद्धा शेतकऱ्यांसोबत संवाद साधला. या कार्यक्रमाचे पान २ वर

## मुलांचे संरक्षण कायद्याच्या जनजागृतीने चांगला समाज घडू शकतो-न्या. खान

### विधी सेवा प्राधिकरण, ईन्नरव्हील क्लब होरायझन, महापालिकेच्यावतीने कायदेविषयक शिबिर

**जालना | प्रतिनिधी -** शहराच्या विकासासाठी प्रत्येक नागरिकाने स्वतःच्या मालकीच्या वस्तूंप्रमाणे सार्वजनिक मालमत्तेची जबाबदारी घ्यायला हवी. मुलांनीही लहान वयातच स्वच्छतेची सवय व भावनिक जाणीव मनात रुजवली तर ते भविष्याचे जबाबदार नागरिक ठरतील. स्वच्छता, शिस्त आणि सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण यासाठीची भावना मनात रुजवणे ही आपल्या समाजविकासासाठी अत्यंत महत्त्वाची बाब आहे. कायद्याने मिळालेल्या मुलांच्या संरक्षणाबाबत जनजागृती झाल्यास चांगला समाज घडू शकतो. यासाठी महापालिका व ईन्नरव्हील क्लब होरायझनचे सुरू असलेले प्रयत्न कौतुकास्पद आहे, असे पान २ वर



### स्वच्छता, कर्तव्याबाबत जनजागृती करण्यावर भर देणार - प्रियंका राजपूत

यावेळी बोलताना महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपूत म्हणाल्या की, विधी सेवा प्राधिकरण आणि महानगरपालिका संयुक्तरित्या स्वच्छता, नियम व कर्तव्याबाबत जनजागृती करणार आहे.सकाळी उठल्यापासून आपले महानगर पालिकाशी नाते निर्माण होते. ज्याप्रमाणे आपण स्वतः पान २ वर



**जालना जिल्हाधिकारी कार्यालयात छत्रपती राजर्षी शाहु महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, नायब तहसीलदार सतीश तायडे, दिपाली राऊत,अतुल केदार, संपदा कुलकर्णी, मिनाक्षी देवाशी, रवींद्र हेलगट यांच्यासह अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.**

## जालना आयटीआय मधील मूलभूत समस्या सोडवण्यासाठी अभाविपचे कौशल्य विकास मंत्र्यांना निवेदन

**जालना | प्रतिनिधी -** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) जालना शाखेच्यावतीने महाराष्ट्र राज्याचे कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा यांची घेऊन औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जालना येथील विविध गंभीर समस्यांबाबत निवेदन देण्यात आले. अभाविप पान २ वर



## संपादकीय पान

# देशी वृक्षांची लागवड करा

मागील काही वर्षात शहरात सिमेंटच्या जंगलाने गर्दी केली आहे. मोठमोठ्या इमारती आणि टॉवर्स उभे करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात आली आहे. जितक्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात आली तितक्या प्रमाणात वुक्ष लागवड करण्यात आली नाही. परिणामी पर्यावरणाचे संतुलन बिघडले. त्याचा परिणाम तापमान वाढीवर झाला. तसेच बेसुमार वृक्षतोडीमुळे अनियमित पाऊस, उष्णता अशा संकटांना तोंड द्यावे लागले. यावर मात करण्यासाठी गेल्या काही वर्षापासून महाराष्ट्र सरकारने वृक्षारोपणाची मोहीम हाती घेतली आहे. दरवर्षी या मोहिमेअंतर्गत लाखो वृक्षांची लागवड केली जाते. या मोहिमेत शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये, विविध सामाजिक व सेवाभावी संस्था, तरुण मंडळांनी यात हिरीरीने भाग घेतला. नागरिकांनीही आपल्या घराजवळ, बागेत, शेतात मोकळ्या जागेत, माळरानावर वृक्षारोपण केले. यावर्षीही ही मोहीम मोठ्या प्रमाणावर राबवण्यात येणार आहे. या वृक्षारोपण मोहिमेत परदेशी वृक्ष मोठ्या प्रमाणावर लावण्यात येतात. जास्तीतजास्त देशी वृक्षांची लागवड करणे आवश्यक असताना ज्या परदेशी वृक्षांची आपल्याला आवश्यकता नाही ; त्यांची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. परदेशी वृक्षांमुळे जैवविविधता मोठ्या प्रमाणावर नष्ट होऊ लागली आहे. त्याचप्रमाणे वाढते तापमान, वातावरणातील बदल दूर करण्यातही परदेशी वृक्ष अपयशी ठरत आहे. देशी वृक्षांमुळे पावसाचे पाणी भूगर्भात टिकून राहते. विदेशी वृक्षांमुळे जमिनीची पाणी टिकवून ठेवण्याची क्षमता नाहीशी होते. दुष्काळामागे हे ही एक महत्वाचे कारण आहे. विदेशी झाडांच्या आम्लयुक्त पानांमुळे जमिनी नापीक होत आहे. विदेशी झाडांच्या फुलात परागकण नसतात त्यामुळे त्यावर फुलपाखरे किंवा भुंगे यासारखे कीटक येत नाहीत. विदेशी झाडांच्या पानांनी आणि सावलीने जमीन निकृष्ट होत आहे. या वृक्षांच्या  फांद्यांचा आणि बुंद्याचा काहीही उपयोग होत नाही. विदेशी वृक्षांमुळे रातकिडे, वटवाघूळ, घारी, गिधाडे, चिमण्या कावळे, घुबड, कबुतरे, पोपट यासारखी सरास् दिसणारे पक्षी दिसेनासे झाली आहेत. एकंदरीत अशा विदेशी वृक्षांमुळे होणाऱ्या परागकण प्रक्रियेला आणि पक्षांद्वारे होणाऱ्या बिजप्रसाराच्या कामाला खीळ बसत असून कीटक, किडे, पक्षी जोडणारी निसर्गाची अन्न साखळी कुमकुवत होत आहे. देशी वृक्ष आपल्या जंगलात किंवा परिसरात पर्यावरणाचा समतोल साधत असतात. त्यांच्या आस्तित्वशी जुळवून घेतलेली, त्यावर जोपासली जाणारी सजीव व्यवस्था असते. या सजीव अवस्थेत मनुष्य, पशुपक्षी, कीटक  सामावले असतात. देशी वृक्षांमुळे पक्षांना कीटकांना, किड्यांनाही  निवारा मिळतो.  विघटन झालेल्या पालापाचोळ्याच्या खतातून निर्माण होणारी पोषकद्रव्ये पुन्हा वृक्षाकडे पाठवण्याचे काम वृक्षांची दूरवर पसरलेली मुळे करत असतानाच जमिनीत खोलवर जाऊन ती जमिनीवरच्या मातीला धरून ठेवतात. विविध कीटकांना, किड्यांना आणि सरपटणाऱ्या जीवांना अशी जमीन उपयुक्त ठरते आणि एक परिपूर्ण पर्यावरण निर्माण होते. विदेशी वृक्ष पुरेसा ऑक्सीजनही देत नाहीत. देशी वृक्ष जितका ऑक्सीजन देतात तितका ऑक्सीजन विदेशी वृक्ष देत नाहीत. काही देशी वृक्ष तर चोवीस तास ऑक्सीजन देतात. वातावरणातील ऑक्सीजन कमी होऊ द्यायचा नसेल तर देशी वृक्षांचीच लागवड करावी. वड, पिंपळ, कडुनिंब, आवळा, चिंच, फणस, आंबा, बेल, कदंब, पळस या वृक्षांची जास्तीतजास्त लागवड करण्यात यावी. देशी वृक्ष औषधी असतात शिवाय हे वृक्ष मोठे झाल्यास त्याची दाट व थंडगार सावलीही मिळते त्यामुळे जास्तीतजास्त देशी वृक्षांची लागवड करायला हवी.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## शेतकरी आणि दुष्काळ

सर्वत्र शेतकरी पेरून मोकळे झाले
पोकळ पाऊस मात्र तकलादू झाले
पाऊस वेळेवर काही बरसत नाही
शेतात पेरलेले काही उगवत नाही
शेतकऱ्यांच्या मागे कायम दुष्काळ
त्यांच्या जीवनात कधी येईल सुकाळ
दुष्काळामुळे शेतकरी झाले हवालदिल
शेतकऱ्यांचा होईल सातबारा कधी नील
पाऊस काही पडेना दुष्काळ काही जाईना
नद्या नाले तुडुंब भरून पूर काही येईना
शेतकऱ्यांच्या नशिबी दुष्काळ किंवा अतिवृष्टी
पाण्याविना सुकली झाडे कोरडी झाली सृष्टी
हवामान खाते अंदाज लावतो पावसाचा
शेतकरी मात्र विश्वास ठेवतो खात्याचा
पाऊस काही पडत नाही एकदाचा
शेतकरी सुखी होत नाही कायमचा
पडला पाऊस तर अतिवृष्टी होते
शेतकऱ्यांचे पीक भुईसपाट होते
या दुष्टचक्रात शेतकरी अडकतो
आत्महत्येसारखा पाऊल उचलतो
शासन मात्र शेतकऱ्यांची दिशाभूल करते
त्यांना खोटे आश्वासन देऊन निवडून येते
पाच वर्षे शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडते
शेतकरी जनता विश्वासाने निवडून देते
शेतकऱ्यांनो शासनावर नका भरवसा ठेवू
बिनकामी पुढाऱ्यांना नका विधानसभेवर नेऊ
पर्यावरणप्रेमी होऊन निसर्गाला अबाधित ठेवू
खूप झाडे लावून पावसाला आपल्याकडे आणू

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर, मो. ७४९८७१५६६१**

# कलाल-कलार समाजाचे भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळाचे घोडे कुठे अडले!

राज्यात काही समाजांनी कोणताही संघर्ष न करता त्यांना तडकाफडकी आर्थिक विकास महामंडळ प्राप्त झाले यांचेही आम्ही स्वागत करतो. कारणं यामुळे समाजाचा विकास होईल मग तो कोणताही समाज असो.परंतु गेल्या चार वर्षांपासून महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना आर्थिक विकास महामंडळासाठी संघर्ष करीत आहे व शासन दरबारी मागणी करीत आहे परंतु सरकार यावर दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येते.कलाल-कलार समाजाला भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ मिळावे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथराव शिंदे,अतुलजी सावे यांना लेखी निवेदन सुध्दा देण्यात आले. सोबतच इतरही मंत्र्यांना निवेदन देण्यात आले आणि याबद्दल चर्चा सुध्दा झाली व त्यांनी ठोस आश्वासन सुध्दा दिले तुमच्या समाजाचा हा महत्त्वाचा प्रश्न आहे त्यामुळे कलाल-कलार समाजासाठी भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात येईल.परंतु सरकार तर्फे आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यासाठी कोणत्याही प्रकारची अधिकृत कारवाई किंवा हालचाली अजून पर्यंत सरकार मार्फत करण्यात आलेली नाही याची खंत व दु:ख समाजाला आहे. समाजाने मंत्री महोदयांना समक्ष निवेदन दिलेच सोबतच मेल व्दारे अनेक पत्र व्यवहार सुध्दा केले परंतु कलाल-कलार समाजाच्या हाती निराशा आली.एककीकडे सरकार कलाल-कलार समाजाला आर्थिक विकास महामंडळापासुन डावलत आहे तर दुसरीकडे सरकारने जाहीर केलेल्या समाजाचे आर्थिक विकास महामंडळ समाजाच्या विकासासाठी कार्य करीत आहे.याची आम्हाला खंत वाटते. कोणताही समाज असो प्रत्येक समाजाचा विकास व्हायलाच पाहिजे.यासाठी महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना नेहमीच स्वागतच करीत आली आहे.सरकारने ब्राह्मण समाजासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन केले याचे स्वागतच.या महामंडळाचे अध्यक्ष आशिषजी दामले महामंडळाच्या माध्यमातून समाजासाठी काय-काय करता येईल यावर गांभीर्याने विचार करून समाजाच्या प्रती विकासाची गती वाढविण्याचे काम करीत आहेत.दिनांक २२ जून २०२५ ला कराड येथे अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या सभेत त्यांनी प्रत्येक जिल्ह्यात परशुराम भवन उभारण्याची घोषणा केली सोबतच पारंपरिक व्यवसाय (पौरोहित्य )करणाऱ्यांना संधी देण्याकरिता पुढील पाऊल उचलण्याचे त्यांनी जाहीर केले.दामलेंच्या कार्याचे आम्ही स्वागत करतो कारण ते समाजाला पुढे नेण्याचे कार्य करीत आहेत.हीच संधी महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटनेला सरकार का देत नाही? आम्हालाही वाटते की प्रत्येक जिल्ह्यात भगवान सहस्त्रार्जुन भवन बनावे व याचा फायदा समाजातील तळागाळातील गरीब समाज बांधवांना व्हावा.परंतु कलाल-कलार समाजाच्या प्रती सरकारचे घोडे कुठे अडले अजुन पर्यंत समजले नाही! आर्थिक विकास महामंडळाच्या बाबतीत पहिला हक्कदार कलाल-कलार समाज होता. परंतु सरकारने आर्थिक विकास महामंडळापासुन डावलल्याने समाज विकासापासुन दुरावल्या जात आहे.आज कलाल-कलार समाज अत्यंत मागासलेला आहे.कारण पारंपारीक व्यवसायांचा विचार केला तर फक्त १ टक्का पारंपरिक (मद्य) व्यवसाय आमच्या समाजाजवळ आहे व ९९ टक्के व्यवसाय पुंजीपती लोकांजवळ आहे त्यामुळे समाज पारंपरिक व्यवसायापासुन आजही कोसो दूर आहे.परंतु आज ९९ टक्के समाज बांधवांचे काय होईल याचा विचार सरकारने केला पाहिजे.समाजाच्या व्यथा आम्ही मंत्रीमहोदयांना समक्ष सांगितल्या सोबतच अनेक निवेदने सुध्दा दिलेत परंतु सरकार कलाल-कलार समाजाच्या प्रती उदासीन असल्याचे दिसून येते यामुळे समाज बांधवांच्या भावना दुखावल्या जात आहे. आताही वेळ गेलेली नाही सरकारने कलाल-कलार समाजाच्या व्यथा समजून घ्याव्यात व इतर समाजाप्रमाणे कलाल-कलार समाजासाठी भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करून समाजाला विकासाच्या प्रवाहात आणावे अशी मागणी महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटनेच्या वतीने माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना करण्यात येत आहे.माननीय देवेन्द्रजी फडणवीस अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेत आहेत यामध्ये मुख्यत्वेकरून आणिबाणीच्या काळातील बंदिवानांची पेंशन दुप्पट करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे याचे स्वागतच याच धर्तीवर कलाल-कलार समाजाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून आपण एक पाऊल पुढे टाकुन कलाल-कलार समाजासाठी भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करून समाजाचा विकासाचा मार्ग मोकळा करावा अशी आग्रहाची विनंती संघटनेच्या वतीने सरकारला करण्यात येत आहे.

**रमेश लांजेवार ( प्रदेश प्रवक्ता )**
**(महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# श्रद्धा आणि भक्ती यांचे उत्कट दर्शन घडवणारी जगन्नाथ रथयात्रा !

पुरी (ओडिशा) येथील जगप्रसिद्ध जगन्नाथ रथयात्रा म्हणजे भगवान श्री जगन्नाथाच्या अर्थात् जगदोद्धारक भगवान श्रीकृष्णाच्या भक्तांसाठी जणू महापर्वणीच ! केवळ भारतातीलच नव्हे, तर जगभरातील भाविकांची रीघ असलेली ही यात्रा श्रद्धा आणि भक्ती यांचे उत्कट दर्शन घडवते. या यात्रेची काही वैशिष्ट्ये पाहुया.

रथयात्रेमध्ये अग्रस्थानी श्री बलराम, मध्ये सुभद्रा-देवी आणि मागे भगवान जगन्नाथ असा रथांचा क्रम असणे !

श्री बलरामाचा ‘तालध्वज’ रथ, मध्यभागी देवी सुभद्रेचा ‘दर्पदलन अथवा ‘पद्मरथ’ आणि तृतीय भगवान श्री जगन्नाथाचा ‘नंदीघोष’ किंवा ‘गरुडध्वज’ ! पुरी येथील जगन्नाथ मंदिर भारताच्या ४ पवित्र तीर्थक्षेत्रांपैकी एक आहे. भगवान श्रीकृष्ण जगन्नाथाच्या रूपात विराजमान असलेले सध्याचे मंदिर ८०० वर्षांहून अधिक जुने आहे. भगवान श्रीकृष्णासह त्यांचे थोरले बंधू श्री बलराम आणि त्यांची बहीण सुभद्रादेवी यांचेही येथे पूजन केले जाते. पुरी रथयात्रेसाठी श्री बलराम, श्रीकृष्ण आणि देवी सुभद्रा यांच्यासाठी ३ वेगवेगळे रथ सिद्ध करण्यात येतात. या रथयात्रेमध्ये सर्वांत पुढे श्री बलरामाचा रथ, मध्ये सुभद्रादेवी आणि सर्वांत मागे भगवान जगन्नाथाचा (श्रीकृष्णाचा) रथ असतो.

तिन्ही रथांना असलेली वैशिष्ट्यपूर्ण नावे आणि त्यांची आगळीवेगळी वैशिष्ट्ये ! श्री बलरामांच्या रथाला ताल ध्वज म्हटले जाते. या रथाचा रंग लाल आणि हिरवा असतो. देवी सुभद्रेच्या रथाला दर्पदलन किंवा पद्मरथ असे म्हटले जाते. तो काळा किंवा निळा किंवा लाल रंगाचा असतो, तर भगवान जगन्नाथांच्या रथाला नंदीघोष किंवा गरुडध्वज असे म्हटले जाते. त्या रथाचा रंग लाल आणि पिवळा असतो. श्री बलराम यांचा रथ ४५ फूट उंच, सुभद्रादेवीचा रथ ४४.६ फूट उंच, तर भगवान जगन्नाथ यांचा नंदीघोष रथ ४५.६ फूट उंच असतो.

हे तिन्ही रथ कडूनिंबाच्या पवित्र आणि परिपक्व लाकडांनी बनवण्यात येतात. यासाठी कडूनिंबाचे निरोगी आणि शुभ झाड निवडले जाते. त्यासाठी एका विशेष समितीची स्थापना करण्यात येते. या रथांच्या सिद्धतेत कोणत्याही प्रकारचे खिळे किंवा अन्य कोणत्याही धातूचा उपयोग करण्यात येत नाही, हे याचे आणखी एक वैशिष्ट्य आहे.

रथासाठी लागणार्या लाकडांची निवड मुहुर्तावर केली जाते. त्यासाठी वसंत पंचमीचा दिवस निवडला जातो. त्या दिवसापासून या लाकडांची निवड चालू होते. प्रत्यक्ष रथांच्या निर्मितीला अक्षय तृतीयेपासून प्रारंभ होतो.

हे तिन्ही रथ सिद्ध झाल्यानंतर छर पहनरा नावाचे अनुष्ठान करण्यात येते. या अंतर्गत पुरीचे गजपति राजा पालखीतून येऊन या तिन्ही रथांचे विधिवत् पूजन करतात. या वेळी सोन्याच्या झाडूने रथाचा मंडप आणि रस्ता स्वच्छ करण्याची प्रथा आहे.

यानंतर रथाचे प्रस्थान होते. आषाढ शुक्ल पक्ष द्वितीयेला रथयात्रेला आरंभ होतो. या दिवशी ढोल, नगारे, तुतारी आणि शंख यांच्या ध्वनीमध्ये भक्तगण हा रथ ओढतात. ज्यांना रथ ओढण्याची संधी मिळते, ते पुण्यवान असतात, अशी भाविकांची श्रद्धा आहे. पौराणिक मान्यतेनुसार रथ ओढणार्याला मोक्षप्राप्ती होते.

पुरी येथील जगन्नाथ मंदिराची अद्भूत आणि बुद्धीअगम्य वैशिष्ट्ये !

श्री जगन्नाथाचे मंदिर जगप्रसिद्ध आहे. अनुमाने ८०० वर्षे प्राचीन असलेल्या या मंदिराचे वास्तुकौशल्य इतके भव्य आहे की, त्याविषयी संशोधन करण्यासाठी जगभरातून वास्तूतज्ञ या मंदिराला भेट देतात.

हे तीर्थक्षेत्र भारताच्या ४ पवित्र तीर्थक्षेत्रांपैकी एक आहे.

श्री जगन्नाथाच्या मंदिराची उंची २१४ फूट इतकी आहे. मंदिराचे क्षेत्रफळ ४ लाख वर्गफुटात पसरलेले आहे.

पुरी येथील कोणत्याही ठिकाणावरून मंदिराच्या कळसावर असलेले सुदर्शन चक्र पाहिल्यास ते आपल्यासमोरच असल्याचे जाणवते. मंदिरावर असलेला झेंडा नेहमीच हवेच्या विरुद्ध दिशेने फडकतो. सामान्यत: प्रतिदिन हवा समुद्राकडून भूमीच्या दिशेने येते आणि सायंकाळी त्याच्याविरूद्ध जाते; परंतु पुरी येथे त्याच्या उलट प्रक्रिया घडते. मुख्य घुमटाची सावली दिवसाच्या कोणत्याही वेळी अदृश्यच असते. येथे पक्षी किंवा विमाने मंदिरावरून उडतांना कधीही दिसणार नाहीत. भोजनासाठी मंदिरात वर्षभर पुरेल इतकी अन्न सामग्री असते. विशेष म्हणजे महाप्रसाद जराही वाया जात नाही. लाखो भाविक हा प्रसाद मोठ्या भक्तीभावाने ग्रहण करतात.

या मंदिरातील स्वयंपाकघर हे जगातील कुठल्याही मंदिरात असणार्या स्वयंपाकघरापेक्षा सर्वांत मोठे आहे. येथे महाप्रसाद करतांना मातीची भांडी एकावर एक ठेवली जातात. सर्व अन्न लाकडाद्वारे प्रज्वलित केलेल्या अग्नीवरच शिजवले जाते. या विशाल स्वयंपाकघरामध्ये भगवान जगन्नाथाला आवडणारा महाप्रसाद बनवण्यात येतो. यासाठी ५०० स्वयंपाकी आणि त्यांचे ३०० साहाय्यक एकाच वेळी सेवा करतात. आशिया खंडातील सर्वांत मोठी पाकशाळा असलेले मंदिराचे स्वयंपाकघर. लाखो भाविक या पाकशाळेतील प्रसाद मोठ्या भक्तीभावाने ग्रहण करतात.

श्री जगन्नाथाला खिचडीचा नैवेद्य प्रथम अर्पण करण्यामागील कारण

कर्माबाई नावाची जगन्नाथाची मोठी भक्त होऊन गेली. ती गरीब असल्याने खिचडी बनवायची. भगवान जगन्नाथ प्रतिदिन सकाळी कर्माबाईच्या घरी खिचडी खाण्यासाठी जात असत. ज्या दिवशी कर्माबाईंनी देह सोडला, त्या दिवशी जगन्नाथाच्या डोळ्यांमध्ये अश्रू आले. ते दृश्य सर्व पुजार्यांनी पाहिले. देवाने पुजार्यांना सांगितले, ‘‘कमबाई मला प्रतिदिन सकाळी खिचडी द्यायची. यापुढे मला खिचडी कोण देणार ?’’ तेव्हा सर्व पुजारी म्हणाले, ‘‘देवा, यापुढे आम्ही तुला प्रतिदिन खिचडीचा नैवेद्य देऊ.’’ तेव्हापासून श्री जगन्नाथाला खिचडीचा नैवेद्य प्रथम अर्पण करण्यात येऊ लागला.

**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे,**
**सनातन संस्था**
**संपर्क- ९२८४०२७१८०**

पान १ वरुन

## जिल्ह्यातील एकही ...

चालु करण्यात येणार आहेत. नवीन व्यवसायासाठी लागणारी मशिनरी शासनाकडून तातडीने पुरविण्यात येईल. संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांनी गुणवत्तेसह  प्रामाणिकपणे आपले काम पार पाडावे. अशी सुचनाही त्यांनी यावेळी केली.

**मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी घेतल्या मॅरेथॉन बैठका**

जनसंवाद/जनता दरबार, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसंदर्भात बैठक, पंडित दीनदयाळ उपाध्याय एकात्म मानव दर्शन हिरक महोत्सव जिल्हास्तरीय समिती बैठक, जिल्हा कौशल्य विभाग आढावा बैठक, संस्था व्यवस्थापन समितीच्या मॅरेथॉन बैठका घेत  संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांना योग्य ते निर्देश दिले.

बैठकीस आमदार बबनराव लोणीकर, आमदार अर्जुन खोतकर, आमदार नारायण कुचे, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल,  कौशल्य विकास विभाग सहायक आयुक्त गणेश चिमणकर, कौशल्य विकास विभाग उपायुक्त विद्या शितोळे, सहसंचालक पी.टी. देवतळे,  यांच्यासह संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती.

## आगामी स्थानिक ...

जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्करराव आबा दानवे, मनोज पांगारकर यांची हि मार्गदर्शन पर भाषणे झाली व होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये विजय मिळवू असे सांगितले

यावेळी देविदास कुचे, दीपक ठाकूर, अवधूत खडके, सुनील पवार, सोपान पेंढारकर, सतीश जाधव, चंपालाल भगत, धनराज काबलीये, भागवत बावणे, कपिल दहेकर, अर्जुन गेही, अनिल कोलते, विष्णू डोंगरे, अनिल सरकटे, सिद्धिविनायक मुळे, शशिकांत घुगे, रवि अग्रवाल, सुनील खरे, ज्ञानेश्वर भागिले, मनोज शिंदे, महेश निकम, संजय डोंगरे, भगवान मात्रे, गजानन नागवे, छत्रगुण कणसे, नितीन राठोड, विक्रम उफाड, पुरुषोत्तम उढाण, सौरभ कुलकर्णी, संजय आटोळे, संपत टकले, सुजित जोगस, वसंत शिंदे, शिवराज जाधव, ज्ञानेश्वर ढोबळे, सोमनाथ गायकवाड, सुमित सुरडकर, विजय मोहिते, राजाराम जाधव, सिद्धेश्वर हासबे, हरिभाऊ गोरे, सतीश केळकर, मुकेश चव्हाण, गजानन खरात, रामजी शेजूळ, कृष्णा गायके, डोंगरसिंग साबळे, प्रमोद गंडाळ, संतोष खंडेलवाल, नागेश अंभोरे इत्यादीसह महानगर व ग्रामीण जिल्ह्यातील कोअर कमिटीमधील सर्व सदस्य व भाजपा पदाधिकारी बंधू-भगिनी उपस्थित होते.

## एसबीआय बँकेकडून ...

प्रस्ताविक जाफराबाद शाखेचे प्रबंधक अरुण मानकर सर यांनी केले यावेळी बोलताना मानकर सर म्हणाले की बँकेबद्दलची भीती शेतकऱ्यांनी मनातून काढून टाकावी आणि आपल्या समस्या बँकेपर्यंत पोहोचाव्या आणि आपण बँकेचा चांगला व्यवहार वाढवून पारदर्शी कारभार केल्यास बँक आपल्या उद्योग व्यवसाय वाढीसाठी  प्रयत्नशील राहील. यावेळी मुख्य प्रबंधक शिवराम खेडूळकर सर. प्रबंधक केतन सर. अतुल तेलंग सर. कृषी क्षेत्रीय अधिकारी. नितीन लोखंडे सर फील्ड ऑफिसर. अमीर सय्यद सर. समाधान राऊत ऋजड. सामाजिक कार्यकर्ते गजानन वायाळ. बोर्डे सर. एस एन फाउंडेशनचे अध्यक्ष दुर्गेश बनकर . संचालक वैभव नवले. उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कृष्णा पाटील इंगळे यांनी केले तर आभार सरपंच विठ्ठल गोरे यांनी मानले.यासह शेतकरी. ग्रामस्थ.माता भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुलांचे संरक्षण ...

प्रतिपादन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव  न्या. करीम खान यांनी येथे बोलताना केले.

विधी सेवा प्राधिकरण, ईन्नरव्हील क्लब ऑफ जालना होरायझन आणि महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दि.  २५ जून रोजी राष्ट्रीय हिंदी विद्यालयाच्या मराठी-इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित  कार्यकर्तृत्व विकास व कायदेविषयक मार्गदर्शन शिबिरात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपूत होत्या. यावेळी व्यासपीठावर प्रमुख वक्ते ॲड. महेश धन्नावत, संस्थेचे अध्यक्ष सतीश बगडिया, मुख्याध्यापक मनीष अग्रवाल, इंग्रजी माध्यमच्या मुख्याध्यापिका रीता टंडन, क्लबच्या अध्यक्षा ड. अश्विनी धन्नावत, सचिव ॲड. पिंकी लड्डा, लोकअभीरक्षक ॲड. योगेश कुलकर्णी आदी मान्यवरांची उपस्थिती होती

न्या. करीम खान पुढे म्हणाले की, स्वतःची वस्तू जशी काळजीपूर्वक जपतो, तशीच सार्वजनिक वस्तूंनाही जपायला हवे. विद्यार्थ्यांनी हे समजून घेतले तर एक आदर्श समाज उभा राहील. यावेळी मुलांनी आम्ही कुटुंबासह  यापुढे स्वच्छता, नियम व सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करू अशी शपथ घेतली. ॲड. अश्विनी धन्नावत म्हणाल्या की, आजच्या पिढीमध्ये कायद्याची ओळख असणे गरजेचे आहे. लैंगिक छळ, सायबर गुन्हे, वाईट स्पर्श अशा विषयांवर शिक्षण मिळाल्यास विद्यार्थी आत्मभान जागवू शकतात. ईनरव्हील क्लब महिलांच्या सक्षमीकरणासाठी व सामाजिक भानासाठी सातत्याने कार्यरत आहे.

या शिबिरात विद्यार्थ्यांना पॉश, पोक्सो, नालसा , डालसा आदी कायद्यासंदर्भात मूलभूत माहिती देण्यात येऊन लैंगिक छळ, चांगला वाईट स्पर्श,  कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळ अशा विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्वच्छता कर्तव्याबाबत ...

उठल्या उठल्या स्वच्छ होतो, त्याप्रमाणे शहरालासुध्दा स्वच्छ ठेवण्यासाठी परिसर स्वच्छ ठेवावा, नियमांचे पालन करावे. ही बाब मुलांनी आपल्या आई-वडिल व कुटूंबाच्या सदस्यांनासुध्दा सांगावी. कारण आपण या शहराचे मालक आहात व मालकाचे कर्तव्य आहे की, स्वतःच्या वस्तूची स्वतः काळजी घ्यावी.

## जालना आयटीआय ...

गेल्या ७६ वर्षांपासून शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असून, विद्यार्थ्यांच्या हितासाठी वेळोवेळी आंदोलन व उपक्रम राबवत आहे. याच पार्श्वभूमीवर, जालना आयटीआयमध्ये विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या समस्या मंत्र्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आल्या.

निवेदनात नमूद केलेल्या प्रमुख समस्यांमध्ये आयटीआय महाविद्यालयाच्या जागेवर वाढते अतिक्रमण., स्वच्छतागृहांची पूर्णतः अनुपस्थिती, ट्रेड विभागांमध्ये पाण्याचे साचलेले डबके, क्लासरूममध्ये विद्यार्थ्यांसाठी बसण्याची व्यवस्था नाही, तसेच वर्कशॉपमध्ये आवश्यक शैक्षणिक साहित्याचा अभाव, CNC लॅबमधील यंत्रसामग्री नादुरुस्त अवस्थेत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

या समस्यांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबाबत उदासीनता वाढत असून, त्यांच्या कौशल्यविकासावर थेट परिणाम होत आहे. यासाठी मूलभूत सुविधांची तत्काळ पूर्तता व्हावी, यासाठी अभाविपने मागणी केली आहे.

यावेळी जालना जिल्हा संयोजक पवन नरवडे, शहर मंत्री गणेश बोंडे यांच्यासह इतर कार्यकर्ते उपस्थित होते. मंत्र्यांनी या निवेदनाची गांभीर्याने दखल घेतली असून लवकरच सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे.

विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी अत्यावश्यक असलेल्या या सुविधांबाबत शासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी अपेक्षा अभाविपने व्यक्त केली आहे.

# शेतकऱ्याचे विनाशर्त पीक कर्ज मंजूर करा

युवासेना जिल्हाप्रमुख शेजुळ यांची मागणी




**जालना । प्रतिनिधी -** सध्याला शेतकऱ्यांची अवस्था म्हणजे, आई खाऊ देना आणि बाप भीक मागू देईना ,या म्हणी प्रमाणे झाली आहे. शेतकऱ्याच्या कोणत्याच शेतमालाला हमीभाव मिळत नाही .महिन्याच्या सुरुवातीस पाऊस पडल्याने बहुदा शेतकऱ्यांनी जवळील काही खर्च करून पेरणी केली आहे .मात्र मागील जवळपास पंधरा दिवसापासून पावसाने उघडित दिल्याने बळीराजा चिंतेत आहे .त्यामुळे राष्ट्रीयकृत बँकांनी शेतकऱ्याला विना विलंब तात्काळ पीक कर्ज मंजूर करावी, अशी मागणी उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे युवासेना जिल्हाप्रमुख शिवाजी शेजुळ यांनी निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात पुढे म्हटले, आहे की मागील वर्षातील नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांची अवस्था दैनंदिन झाली असून राज्य शासनाच्या वतीने पीक विम्याचे धरसोडीचे धोरण सुरू आहे. पीक कर्जासाठी शेतकऱ्यांचे अर्ज भरल्यानंतर ही राज्य शासनाने त्वरित कर्ज मंजूर करण्याचे आदेश असतानाही शेकडो अर्ज युनियन बँक ऑफ राम नगर येथे मोर्चा काढण्यात आला. यावेळी निवेदन देताना, उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शिवसेना युवासेना सर्व पदाधिकारी उपजिल्हाप्रमुख श्री मुरलीधर शेजुळ, माधव काटकर ,गजानन कोरकळ , राम शेजुळ, दिलीप डोंगरे ,पांडुरंग डोंगरे, बाबासाहेब डोंगरे यांनी व सर्व शेतकऱ्यांनी शाखा अधिकारी यांना निवेदन दिले आहे.

# राजश्री शाहू महाराज पतसंस्थेत शाहू महाराज जयंती साजरी

**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्याने जाफ्राबाद राजर्षी शाहू महाराज पतसंस्थां मध्ये फुल माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी राजश्री शाहू महाराज यांच्या जीवन कार्यावर स्थानिक संचालक अलके सोमानी यांनी प्रकाश टाकला. त्यांच्या जीवनकार्याचा परिचय दिला लोककल्याणकारी राजा म्हणून राजश्री शाहू महाराजांची ओळख आहे. समाजाच्या सुखदुःखात नेहमी सहभाग घेणारे आणि सुखदुःखाला सामोरे जाणारे, आपल्या राज्यातील जनतेला सुख समृद्धी मिळावी म्हणून झटणारे असे राजश्री शाहू महाराज यांची ओळख सगळ्या जगाला आहे. याप्रसंगी बँक मॅनेजर किरण कासोद यांचीही समाजाची भाषण झाली. या वेळी येथील स्थानिक संचालक अलकेश सोमानी, विलास खमाट, सतीश मरकड, राहुल जंजाळ,जोशी डॉ. व्यंकटेश साहेब, मॅनेजर शाखा व्यवस्थापक किरण कासोद, रोखपाल ज्ञानदेव कोरडे शिपाई भागवत खंडागळे यांची उपस्थिती होती. आभार प्रदर्शन नंतर कार्यक्रमाची सांगता झाली.



# सत्यशोधक विद्यालयात राजर्षी शाहू महाराज यांची जयंती साजरी



**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** मानव विकास व पूर्ननिर्माण संशोधन संस्था औरंगाबाद संचलित सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोषेगाव तालुका भोकरदन जिल्हा जालना येथे आज २६ जून रोजी आरक्षणाचे जनक छत्रपती राजर्षी शाहूजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली याप्रसंगी शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष निलेश कंकाळ सर तर प्रमुख पाहुणे प्रा .दिनेश मगरे हे होते. स्नेहा घोडके तनवी दाभाडे भक्ती मोतीकर या विद्यार्थ्यांनी छत्रपती शाहूजी महाराज यांच्या विचारावरती प्रकाश टाकला.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे यांनी शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, शाहू महाराज व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा एकमेकांच्या विचारांची कसा प्रभाव आहे. याबद्दल मार्गदर्शन केले तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष निलेश कंकाळ शाहू महाराजांच्या शाहू पॅलेस व शाहू महाराजांच्या नावाणे सुरू असलेल्या स्कॉलरशिप विषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आकांक्षा खरात व आभार प्रदर्शन भक्ती मोतीकर या विद्यार्थिनीने केले.मानव विकास पूर्ननिर्माण संशोधन संस्थेचे अध्यक्ष तथा प्राचार्य सुनीलजी वाकेकर साहेब तसेच संस्थेच्या सचिव जयश्रीताई बनकर मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



**महानगरपालिका जालना कार्यालयात समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता या सर्व घटकांना विकासाची समान संधी देणारे राजे छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आयुक्त संतोष खांडेकर यांच्यासह मनपा उपायुक्त, अधिक्षक विजय फुलंब्रीकर, श्रीमती मोरे आदींसह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.**

# १००% विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांची पूर्तता करण्याची मागणी

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** नवीन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ सुरू झाल्यानंतर शाळांमध्ये विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले असले तरी अनेक शाळांमध्ये अजूनही सर्व विद्यार्थ्यांना पुस्तकांचा पुरवठा झालेला नाही. काही शाळांना अर्धवट पुस्तके मिळाल्याची तर काहींना अजिबातही पुस्तके न मिळाल्याची तक्रारी विविध ठिकाणाहून प्राप्त झाल्या आहेत.



ह्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनचे राज्य प्रवक्ता तथा हॅपी टू हेल्प फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम यांनी राज्य प्रकल्प संचालक समग्र शिक्षा, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्याकडे निवेदन सादर केले आहे. विशेषतः छत्रपती संभाजीनगर शहर व जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या संख्येपेक्षा कमी पुस्तके मिळाल्याची बाब त्यांनी नमूद केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, शैक्षणिक साधनसामग्री प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत वेळेवर पोहोचणे हे शासनाचे व समग्र शिक्षा अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. मात्र सध्याची परिस्थिती पाहता अनेक विद्यार्थी पुस्तके न मिळाल्यामुळे त्याच्या शैक्षणिक प्रगतीवर परिणाम होऊ शकतो.

शेख अब्दुल रहीम यांनी संबंधित अधिकाऱ्यांनी या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने योग्य ती कारवाई करावी, ही अपेक्षा व्यक्त केली आहे. पुस्तकांचे वितरण पूर्ण झाल्यानंतर उर्वरित विद्यार्थ्यांसाठी पुस्तके उपलब्ध करणे अधिक कठीण होते, म्हणून प्रत्येक शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना आवश्यक पाठ्यपुस्तकांची तात्काळ पूर्तता करण्यात यावी, अशी मांगणी त्यांनी निवेदनाच्या माध्यमातून केली आहे. तसेच राज्यातील ज्या कोणत्या शाळेला पाठ्यपुस्तके कमी मिळाली आहे त्यांनी माझ्याशी वैयक्तिक संपर्क साधावे असे ही आवाहन शेख अब्दुल रहीम (९६५७५२४५४५) यांनी केले आहे.

# सामान्य जनतेसाठी त्यांच्या सुखासाठी झटणारा राजा म्हणजे राजश्री शाहू महाराज - विष्णू जाधव



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील प्रसिद्ध नवभारत शिक्षण संस्थेची नवभारत कनिष्ठ महाविद्यालय व श्रीमती जे बी के विद्यालयांमध्ये लोककल्याणकारी राजा राजश्री शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थितांमध्ये प्राचार्य नंदकुमार काळे. संस्थेचे संचालक प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, सखाराम बोरकर प्राध्यापक सुनील बनसोडे, प्राध्यापक अरुण आहेर, प्राध्यापक रामदास भांगे, प्राध्यापक कैलास जाधव, प्राध्यापक गजानन धोटे, प्राध्यापक डॉक्टर आनंद जाधव, रमेश इंगळे, राजेंद्र जगताप, कैलास भुतेकर राजेश शेवाळे, रवींद्र मोरे, दिनकर उखर्डे दत्ता उखर्डे, समाधान कांबळे वासुदेव शिरसागर, श्रीमती आवटी मॅडम, श्रीमती पाटील मॅडम, श्रीमती जाधव मॅडम, श्रीमती शेख मॅडम, श्रीमती भिलावेकर मॅडम, श्रीमती लंबे राजू डोमळे, मॅडम, नागोराव देशमुख, दगडोबा तांबेकर, दीपक देशमुख, आधी सर्वांनी प्रतिमेचे पूजन केले. याप्रसंगी विष्णू जाधव यांनी राजश्री शाहू महाराज यांच्या जीवन व कार्यावर प्रकाश टाकला त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की सर्वसामान्य जनतेचा राजा म्हणजेच राजश्री शाहू महाराज. सामान्य जनतेला सुखी ठेवण्यासाठी आनंदी ठेवण्यासाठी त्यांचे जीवन सुखकर होण्यासाठी विविध योजना राबवणारे, कल्याणकारी योजना राबवणारे, सामाजिक योजना राबवणारे, शेतीसाठी विविध योजना राबवणारे असे राजश्री शाहू महाराज जनतेच्या कल्याणाचे राजे होते ही त्यांनी आपल्या भाषणातून सांगितले.

# नळविहीरा जिप शाळेत छत्रपती राजश्री शाहू महाराज जयंती उत्साहात

जाफ्राबाद । प्रतिनिधी - तालुक्यातील नळविहीरा जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, नळविहीरा येथे सामाजिक न्यायाचे प्रणेते आणि समतेचे पुरस्कर्ते छत्रपती राजश्री शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात व अभिमानपूर्वक साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक एस. के. नागरे, शालेय समितीचे अध्यक्ष शंकर गाडेकर, सदस्य आकाश वाकोडे, प्रल्हाद गाडेकर, सुनील गायकवाड, दिगंबर गायकवाड तसेच ज्येष्ठ शिक्षक दत्तू मुनेमाणिक बी एस. जाधव, सावता तिडके, प्रमोद कळंबे, सुनिता खलसे, पूजा गहेरवाल व श्रीमती बकतकार मॅडम यांची उपस्थिती होती.

या प्रसंगी शिक्षक श्री. सावता तिडके यांनी शाहू महाराजांचे जीवनकार्य, त्यांच्या सामाजिक सुधारणांचे योगदान आणि शिक्षण क्षेत्रातील भूमिकेवर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमानिमित्त शालेय समितीचे माजी अध्यक्ष सुनील गायकवाड यांच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना मिठाईचे वाटप करून शाहू महाराजांच्या कार्यास मानवंदना देण्यात आली.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक समतेची जाण निर्माण झाली असून, उपस्थितांनी आयोजकांचे आभार मानले.



# ओम शांती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात राजश्री छत्रपती शाहू महाराज यांची जयंती उत्साहात



**अंबड । प्रतिनिधी -** येथील ओम शांती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात राजश्री छत्रपती शाहू महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात राजश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेच पूजनाने व स्वागत गीताने करण्यात आली. याप्रसंगी गणेश चव्हाण, रविंद्र गीते, ज्ञानेश्वर राऊत व प्राचार्य सुरेश मुंडे यांनी राजश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक घागरे यांनी केले तर आभार प्रदर्शन संतोष शिंदे यांनी केले.



**जालना शहरातील पंचमुखी महादेव मंदीर पाणीवेस ते दर्गावेस रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनाद्वारे येत्या चार दिवसात काम पुर्ण न केल्यास आंदोलनाचा ईशारा देण्यात आला आहे. यावेळी सेवकराम नारियलवाले, आरिफ खान, रवि सोनटके, चंद्रकांत जाधव, अख्तर भाई कुरेशी, संतोष भंवर, राजू दोडके, जहीर शेख, राम मोरे, बबलू छड़ीदार, राकेश वैष्णव यांच्यासह परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.**



## प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने प्राथमिक शिक्षणाधिकारी श्रीमती संगीता भागवत यांचा सत्कार



**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा परिषद जालना येथे नव्याने रुजू झालेल्या प्राथमिक शिक्षणाधिकारी श्रीमती संगीता भागवत मॅडम यांचा प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या सत्कार समारंभात शिक्षक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी श्रीमती संगीता भागवत मॅडम यांचे स्वागत करून त्यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले.सत्कार प्रसंगी श्रीमती संगीता भागवत मॅडम यांनी प्राथमिक शिक्षकांच्या सर्व समस्या प्राधान्याने सोडविण्याचे आश्वासन दिले. यावेळी प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब जुंबड यांच्यासह पदाधिकारी शिवाजी बांदल, सुभाष भडांगे, गणेश भुतेकर, मनोहर साबळे, राजू खरात, मंता फुके, जगन्नाथ शिंदे, प्रमोद पवार, नागेश काकडे, जयदीप शेळके, गौतम ढवळे, माधव भोसले, राजेश्वर नाईक, सुदर्शन भुतेकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमात शिक्षकांच्या विविध समस्यांवर चर्चा झाली असून, शिक्षण क्षेत्रातील सुधारणांसाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याचे आवाहन करण्यात आले.

## कुणबी युवा मंच माणगाव संघटनेतर्फे रक्तदान शिबिर

**मुंबई -** रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान हा बोध घेऊन कुणबी युवा मंच,मुंबई (रजि.) तालुका माणगाव आणि कुणबी युवती महिला संघटना मुंबई तालुका - माणगाव आयोजित आणि लोकमान्य टिळक रुग्णालय,सायन रक्तपेढी यांच्या पुढाकारने सायन रुग्णालय,मुंबई येथे रविवार दि.२९ जून २०२५ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन सकाळी ९.00 ते दुपारी ४.00 यावेळेत करण्यात आले आहे. मुंबई आणि तसेच पूर्ण महाराष्ट्र मध्ये रक्ताची ची अपुरी उपलब्धता बघता कुणबी युवा मंच मुंबई तालुका माणगाव या सामाजिक संघटनेमार्फत भव्य रक्तदान शिबीर आयोजन करण्यात आले आहे. सर्वांनी या रक्तदान शिबिरामध्ये सहभागी होऊन रक्तदान करावे असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी कल्पेश चाचले - ९२२२०८०५५५/ संतोष उभारे - ८३५६०५४७८९ यांच्याशी संपर्क साधावा.

# विद्यार्थ्यांनी अनुभवली मतदान प्रणाली

### प्रतिभा माध्यमिक विद्यालयात वर्गप्रतिनिधीसाठी निवडणूक प्रक्रिया

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** प्रतिभा माध्यमिक विद्यालय, काजळा या शाळेने लोकशाही पद्धतीने मतदान घेत वर्ग प्रतिनिधी व उप वर्ग प्रतिनिधी निवडले. विद्यालयाने मागील २ वर्षांपासून लोकशाही पध्दतीने प्रतिनिधी निवडीची परंपरा कायम ठेवली आहे. शाळा प्रतिनिधी मुले या गटातून रामेश्वर मांगडे तर मुलींमधून मुलींमधून कु.वैष्णवीं गरड यांनी प्रतिनिधींनी विजय संपादन केला.

लोकशाही पद्धतीने निवडणूक आयोगाने दिलेल्या नियमानुसार जशी लोकसभा-विधानसभा निवडणूक होते. तशीच 'एतच् डर्ळीश्ररीी रर्ीि' वर प्रतिभा माध्यमिक विद्यालायची निवडणूक प्रक्रिया शाळेचे मुख्याध्यापक सूर्यकांत गुजर, वर्ग १० वी चे वर्गशिक्षक भगवान धनगे यांच्या मार्गदर्शनाखाली राबवतात. वर्ग प्रतिनिधी निवडताना निवडणूक लढविण्यास इच्छुक उमेदवारांची यादी शाळेतील प्रथम दर्शनी फलकावर लावण्यात येते. निवडणूक अर्ज दाखल करण्यापासून ते माघार घेण्याचा कालावधी देखील नमूद करीत शेवटी दोन दिवस त्या उमेदवारांस प्रचाराला देखील वेळ दिला जातो. २० जून ते २४ जूनपर्यंत या सर्व प्रक्रिया निवडणूक निर्णय अधिकारी भगवान धनगे यांच्या मार्गदर्शनाखाली इतर शिक्षक पारदर्शकपणे राबविण्यास सहकार्य करतात.

सर्व विद्यार्थ्यासमोर मतमोजणीची प्रक्रिया (ता.२४ ) मतदान प्रक्रिया होऊन सर्व विद्यार्थ्यासमोर मतमोजणीची प्रक्रिया सर्व शिक्षक पूर्ण करीत उमेदवारांना पडलेल्या मतानुसार निकाल जाहीर केला.

शाळा प्रतिनिधी मुले या गटातून रामेश्वर मांगडे तर मुलींमधून कु.वैष्णवीं गरड यांनी वर्ग प्रतिनिधीं म्हणून विजय संपादन केला. निवडून आलेल्या उमेदवारांने आपल्या वर्गाची शिस्त, विविध उपक्रमात जास्तीतजास्त सहभाग घेत त्याची गुणवत्ता सिद्ध करणे यासह प्रत्येक सांस्कृतिक कार्यक्रमात आपल्याच वर्गाचा डंका राहील यासाठी प्रयत्न करण्यात महत्वाची भूमिका निभावतात.

मागील २ वर्षांपासून प्रतिभा माध्यमिक विद्यालय या शाळेत वर्ग प्रतिनिधी लोकशाही मतदान पद्धतीने निवडण्याची परंपरा आहे. यंदा देखील सदरची निवडणूक निर्भीड वातावरणात पार पडली.

१६ जून रोजी वर्ग प्रतिनिधीची निवडणुकीची घोषणा करण्यात आली. १७ ते १९ जूनपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करणे. २० तारखेला प्राप्त



उमेदवारी अर्जाची छाननी होत वैध उमेदवारांना चिन्ह वाटप करण्यात आले. २१ ला अर्ज माघारी घेण्याचा दिनांक होता. तर २२ ते २३ जूनपर्यंत प्रचार करण्याची मुदत देण्यात आली. २४ ला प्रत्यक्ष मतदान होत दुपारी २ वाजता सर्व विद्यार्थ्यांसमोर मतमोजणी प्रक्रिया पार पडली, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी भगवान धनगे यांनी दिली.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सूर्यकांत गुजर, सहशिक्षक सुनील पाटील, दत्तात्रय मुळे, दगडू पठाण, लक्ष्मण कुऱ्हाडे, मिलिंद उनवणे, प्रवीण गावडे,योगेश टेके शिक्षकेत्तर कर्मचारी दीपक परजने, प्रभाकर कोळेकर, अरुणा शेरे तसेच विद्यार्थी मोठ्या संख्याने हजर होते.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.